<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०११</u>
<u>निशाणी ८३ पुढे सुरु.....</u>

शपथेवर पुढे सुरु –

<u>वादी तर्फे विधीज्ञ श्री.एस.टी.इंगळे यांच्या मार्फत उलटतपासः–</u>

८. मला माहित नाही की, कलावतीबाईने रिधोरा येथील गट नं. १७१/२अ मधील ८१ आर क्षेत्रासाठी दावा दाखल केलेला आहे किंवा कसे. सदर दाव्यात मी प्रतिवादी म्हणुन झालो आणि लेखी जबाब दाखल केला. त्या लेखी जबाबासोबत मी कलावतीबाईने केलेल्या मनाई हुकूमाच्या अर्जाला म्हणणे दिले.

प्रश्न – तुम्ही लेखी जबाबासोबत कलावतीबाई विरुध्द गट नं. १७१/२अ मधील ८१ आर क्षेत्रासाठी मनाई हुकूमाचा आदेश मिळावा म्हणुन अर्ज केला होता ?

उत्तर – मला माहित नाही.

कलावतीबाईने केलेला मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर झाला किंवा कसे, मला आठवत नाही, माहित नाही. मी केलेला मनाई हुकूमाचा अर्ज न्यायालयाने खारिज केला किंवा कसे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मनाई हुकूमाच्या आदेशाविरुध्द मी मा. जिल्हा न्यायाधीश, अकोला यांच्याकडे अपील दाखल केले होते. सदरचे अपील खारिज झाले किंवा कसे माझे लक्षात नाही. त्या आदेशाविरुध्द मी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर येथे प्रकरण दाखल केले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरण खंडपीठात प्रलंबित असतांना दि. १०.०७.२०१२ रोजी मी कलावतीबाई आणि श्याम भिरड यांचे विरुध्द दावा दाखल केला होता. मला मी दाखल केलेल्या प्रकरणावरील माझी सही दाखविल्यास मी ओळखु शकेल.

न्यायालयाकडुन प्रश्न - तुम्हाला लिहिता, वाचता येते का, तुम्हाला सही करता येते का ?

उत्तर – नाही.

९. मला नि.दि.दावा क्र. ९४/२०१२ या दाव्यातील नि.क्र. १ व त्यावरील आदेशाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदर दस्तावर माझ्या सहया नाहीत. नि.दि.दावा क्र. ९४/२०१२ मधील नि.क्र १ च्या प्रमाणित प्रतीस **नि.क्र. १०३** देण्यात येते.

प्रश्न – मला नि.दि.दावा क्र. ९४/२०१२ मधील दिनांक १२.०६.२०२४ रोजी दाखल प्रकरण काढुन घेण्याच्या अर्जाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली, सदर अर्जाच्या प्रमाणीत प्रतीस **नि.क्र. १०४** देण्यात येते. सदर अर्ज तुम्ही दावा काढुन घेण्यासाठी केला होता ?

उत्तर – मला माहित नाही.

१०. मला माहित नाही की, मी नि.दि.दावा क्र. ९४/२०१२ मध्ये दिनांक १०.१२.२०१८ रोजी पुराव्याचा प्रतिज्ञालेख दाखल केला किंवा कसे. मला नि.दि.दावा क्र. ९४/२०१२ मधील दिनांक १०.१२.२०१८ रोजीच्या पुराव्याच्या प्रतिज्ञालेखाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. त्यावरील सही माझी नाही. सदर प्रतिज्ञालेखाच्या प्रमाणित प्रतीला **नि.क्र.१०५** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, मला नि.क्र. १०३ ते १०५ या दस्तावेजामधील लिहिलेल्या मजकुराबाबत मला काही माहिती नाही.

११. मला माझे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ८३ दाखविण्यात आले. नि.क्र. ८३ वरील सहया माझ्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात काय लिहिलेले आहे, मला माहित नाही.

प्रश्न – तुम्हाला प्रतिज्ञापत्रातील मजकुर वकीलांनी वाचुन दाखविला का ?

उत्तर – मला आठवत नाही, माझे लक्षात नाही.

मला विसरण्याचा आजार (स्मृतिभ्रंश) नाही.

१२. मौजे रिधोरा येथील गट नं. १७१/२अ चे क्षेत्र २ हे ४२ आर आहे किंवा कसे मला माहित नाही. ज्या शेताचा वाद सुरु आहे त्या शेताच्या पश्चिमेकडुन माझे शेत होते. (साक्षीदाराला पुन्हा पुन्हा एका प्रश्नाची एक उत्तर देण्याची समज देण्यात आली, तरी देखील साक्षीदार एका प्रश्नाचे दोन उत्तर देत आहे.) ज्या शेताचा वाद सुरु आहे त्या शेताच्या पुर्वेकडुन कलावतीबाईचे पतीचे शेत होते, सद्या कलावतीबाईचे पतीच्या मृत्युनंतर ते शेत वारसांकडे आहे. कलावतीबाईचे पती बाबुलालच्या शेताच्या पुर्वेकडुन कलावतीबाईचे दिर माणिक ओंकार अघडते यांचे शेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, कलावतीबाईचे शेत, तिचे पतीचे शेत आणि माणिक अघडतेचे शेत एकाच गट नंबरचे हिस्से आहेत. सदर गट हा अकोला येथील मुस्लीम समाजाच्या व्यक्तीचा होता. त्याचे

नाव कदीर होते. त्या मुस्लीम समाजाच्या व्यक्तीकडुन ८१ आर शेत अनुसयाबाई तानु दंदी हिने विकत घेतले होते. त्या गटातील ४ एकर शेत प्रत्येकी २ एकर (८१ आर) प्रत्येकी बाबुलाल आणि माणिक यांनी सन १९९४ मध्ये विकत घेतले होते. अनुसयाबाई तानु दंदीने ८१ आर शेत बाबुलाल आणि माणिक यांनी खरेदी घेण्यापुर्वी खरेदी केले होते. अनुसयाबाई, बाबुलाल आणि माणिक यांनी जसे शेत विकत घेतले त्याप्रमाणे ते वहिती करीत होते. त्या शेताचा महसुल अभिलेख मी पाहिलेला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, मी शेत वाहिले नाही, म्हणुन पाहिले नाही.

१३. अनुसयाबाईच्या मृत्युनंतर धर्माजी तानुजी दंदी अनुसयाबाईच्या शेतीचा मालक झाला. धर्माजी दंदी यांनी ते शेत श्याम पांडुरंग भिरड यांना विक्री केले. त्या खरेदीखतावर माझी साक्षीदार म्हणुन सही आहे. खरेदीखतामधील मजकुर वाचुन समजुन आम्ही सर्वांनी सहया केल्या होत्या. धर्माजी दंदी यांच्याकडुन श्याम भिरडने खरेदी केलेल्या शेताचे खरेदीखत मी श्याम भिरड कडुन घेवुन आल्यानंतर या दाव्यात नि.क्र. ९६ वर दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, कलावतीबाईने माझे विरुध्द दावा दाखल करेपर्यंत मी श्याम भिरड विरुध्द सदरचे खरेदीखत रद्द करणेबाबत कोणताही दावा दाखल केलेला नाही.

प्रश्न – श्याम भिरडविरुध्द तुम्ही सावकारी कायदया अंतर्गत आजपर्यंत कोणतीही केस केली नाही ?

उत्तर – करायचे काम पडले नाही.

हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दाव्याच्या कामासाठी बऱ्याच वेळा मी आणि श्याम भिरड सोबत न्यायालयात आलेलो आहे.

प्रश्न – तुम्ही दाखल केलेल्या दाव्यात श्याम भिरड हजर झाले होते ?

उत्तर – एखदा आले होते.

श्याम भिरड हा श्रीमंत माणुस आहे. समाजात त्याची प्रतिष्ठा आहे.

प्रश्न – तो माणुस इज्ज़तदार असल्यामुळे आमच्या गावातील लोक त्याला मानतात ?

उत्तर – मला माहित नाही.

कलावतीबाईच्या नावाने वाद शेताची नोंद झाली किंवा कसे मला माहित नाही.

प्रश्न – तुम्ही ७/१२ उताऱ्यावर कलावतीबाईची नोंद पाहिली का ?

उत्तर – काही काम पडले नाही.

हे म्हणणे खरे आहे की, त्या नोंदविरुध्द मी आजपर्यंत कोणत्याही न्यायालयात कोणतेही प्रकरण दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, श्याम भिरडच्या नावाने ८१ आरच्या झालेल्या नोंदीबाबत मी आजपर्यंत कोणत्याही न्यायालयात केस केलेली नाही.

**वादी तर्फे विधीज्ञ श्री.एस.टी.इंगळे यांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.12.24 17:21:55 +0530

दिनांक : २४/१२/२०२५.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बाळापूर.